Annexure - V



मे. दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लिमिटेड (DBSIL) महाराष्ट्र, मुक्काम पोस्ट-आरळा करुंगळी, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मोलॅसिस/केन ज्यूस/धान्यावर आधारित १५०.० केएलपीडी क्षमता आसवणी प्रकल्प तसेच प्रस्तावित आसवणी को-जनरेशन विद्युत प्रकल्प क्षमता ३.० मेगावॅट आणि सध्याच्या सह-ऊर्जा प्रकल्प ४.५ मेगावॅट ते ७.५ मेगावॅट क्षमता विस्तार तसेच सध्याची ऊसगाळप क्षमता ३५०० टीसीडी ते ६००० टीसीडी विस्तार प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत.

---

मे. दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लिमिटेड (DBSIL) महाराष्ट्र, मुक्काम पोस्ट-आरळा करुंगळी, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मोलॅसिस/केन ज्यूस/धान्यावर आधारित १५०.० केएलपीडी क्षमता आसवणी प्रकल्प तसेच प्रस्तावित आसवणी को-जनरेशन विद्युत प्रकल्प क्षमता ३.० मेगावॅट आणि सध्याच्या सह-ऊर्जा प्रकल्प (४.५ मेगावॅट ते ७.५ मेगावॅट क्षमता) विस्तार तसेच सध्याची ऊसगाळप क्षमता (३५०० टीसीडी ते ६००० टीसीडी) विस्तार प्रकल्प उभारणीची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार दिनांक, ३० जून, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ३९/२०२२,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०६१७-एफटीएस-००७१ दिनांक १७ जून २०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली त्यानुसार खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) श्रीमती. मोसमी चौगुले- बर्डे
अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली - अध्यक्ष.

२) श्री.जगन्नाथ शं. साळुंखे
प्रादेशिक अधिकारी,म. प्र. नि. मंडळ, कोल्हापूर. - सदस्य.

३) श्री.नवनाथ सं. अवताडे

उप प्रादेशिक अधिकारी,सांगली - आयोजक.
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

श्री नवनाथ सं. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्रीमती. मोसमी चौगुले-बर्डे, अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले की, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी वेळी प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली. आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास मे. दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लिमिटेड (DBSIL) महाराष्ट्र, मुक्काम पोस्ट-आरळा करुंगळी, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांचा प्रस्तावित मोलॅसिस/केन ज्यूस/धान्यावर आधारित १५०.० केएलपीडी क्षमता आसवणी प्रकल्प तसेच प्रस्तावित आसवणी को-जनरेशन विद्युत प्रकल्प क्षमता ३.० मेगावॅट आणि सध्याच्या सह-ऊर्जा प्रकल्प (४.५ मेगावॅट

ते ७.५ मेगावॅट क्षमता) विस्तार तसेच सध्याची ऊसगाळप क्षमता (३५०० टीसीडी ते ६००० टीसीडी) विस्तार प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि १३ जून, २०१९ रोजी सुधारित केल्यानुसार संवर्ग अ (१) ५ (जी), ५ (जे), मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ऑनलाईन मंजूरी दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सांगली यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र -"सकाळ "यात मराठी व राष्ट्रीय वृत्तपत्र "दि टाइम्स ऑफ इंडिया " यात इंग्रजीत दिनांक ३० मे, २०२२ रोजी जाहिर सुनावणची सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हाधिकारी कार्यालय-सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सांगली, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सांगली , तहसीलदार, तहसील कार्यालय-शिराळा, जिल्हा - सांगली, मुख्याधिकारी, शिराळा नगरपंचायत, शिराळा, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय- करुंगळी, आरळा, मणदूर, तालुका - शिराळा, जिल्हा - सांगली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय - सोंडोली, तालुका - शाहुवाडी, जिल्हा-कोल्हापूर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची परवानगी मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले

की सदरहू प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी रु. १८५.० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी एकूण भांडवली खर्च ५० कोटी तर पर्यावरण सयंत्रणा देखभालीसाठी रुपये २.५० कोटी प्रतिवर्ष राखीव ठेवलेले आहेत.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तरे दिली :-**

१) **श्री बाळासाहेब कृष्णा नाईकवडी, उपसभापती, पंचायत समिती-शिराळा, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-**

प्रकल्प ज्या क्षेत्रात कार्यरत आहे,ते क्षेत्र शासनाने “Eco-Sensitive Zone (ESZ) / पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र” म्हणून घोषित केलेले आहे. त्याचप्रमाणे येथील नैसर्गिक संपत्ती/परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने प्रकल्पाच्या ६.० (सहा) कि.मी. अंतरावर चांदोली राष्ट्रीय व्याघ्र प्रकल्प विकसित केलेला आहे. तसचे राखीव वन (Reserved Forest) पुसाराळे हे १०.० कि.मी. परिघाच्या आत असून इतरही बरीच राखीव वने आहेत.

चांदोली परिसरात वनस्पतींच्या व प्राण्यांच्या दुर्मिळ प्रजाती आहेत. त्या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तेथे त्याचे संवर्धन करण्यात येत आहे.

सदरहू मोलॅसिस/उसाचा रस/धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प येथे जो विकसित करण्यात येणार आहे आणि जरी सादरीकरणात शून्य द्रव निस्सारण (झेडएलडी) व शून्य प्रदूषण प्रकल्प आहे असे जरी सांगितले, तरी प्रकल्पात उत्पन्न होणारा स्पेंट वॉश हा जरी प्रकल्प प्रवर्तक हे बॉयलरमध्ये जाळणार असे सांगितले, तरीही असे प्रकल्प कोठेही झिरो पोल्युशन म्हणून यशस्वी झालेले नाही. स्पेट वॉश

जेव्हा जाळले जाते, तेव्हा त्यातील पोटॅशचे व सल्फरचे सूक्ष्म कण हे हवेत मिसळले जातात. त्यामुळे मनुष्याला व प्राण्यांनाही श्वसनाचे विकार होतात हे सिध्द झालेले आहे.

सधस्थितीत या कारखान्यातून उत्पन्न होणारे उप-पदार्थ-मळी हे बाहेर सोडले जातात. ते कारखान्याला लागून असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतात वारणा डावा बँक सिंचन कालव्यात मिसळतात.

त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की येथे आवर्जून सांगावे लागते की हा कारखाना हा नदीपासून २०० मीटर अंतरावर आहे. जर हा प्रकल्प येथे उभा राहिला तर कारखान्यातून बाहेर पडणारी मळी ही येथील पाण्यात मिसळून येथील जलचर सृष्टीवर व परिसरातील मानवी आरोग्यावर याचा परिणाम होणार आहे. वारणा नदी पुढे कृष्णा नदीला मिळते त्यामुळे या काठावर असा प्रकल्प नसावा.

या प्रकल्पाचे नदीपासूनचे अंतर हे जास्तीतजास्त २००-२५० मीटर असेल, ते नियम तपासून पाहण्यात यावे. या प्रकल्पामुळे येथील जलचर प्राण्यांचे जीवनचक्र (Life chain/cycle) हे धोक्यात येणार आहे व मानवाच्या पिढ्यानपिढ्यांवर परिणाम होणार आहे. तरी माझी याबाबत हरकत असून पाण्याच्या प्रदूषणाबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा.

येथील परिसरात अतिशय सुंदर अशी नैसर्गिक संपदा लक्षात घेता हा परिसर पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करावे अशी येथील सर्व नागरिकांची मागणी आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांना या परिसरात परवानगी देणे म्हणजे पर्यावरणाच्या ऱ्हासाबरोबरच पर्यटन विकासावर परिणाम होणारा आहे. तरी वरिल बाबींचा विचार करुन आम्ही शेतक-यांचा, येथील पर्यावरणवाद्यांचा या प्रकल्पास विरोध असून आम्ही आमचे हरकती, आक्षेप नोंदविले असून त्याचा गांभार्याने विचार करण्यात यावा.

२) <u>श्री बाजीराव बळवंत शेडगे, राहणार-शेडगेवाडी, तालुका- शिराळा,जिल्हा-सांगली:-</u>

सदरहू प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर परिसरात विकासाची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. परिसरातली शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य पुरविले आहे. तसेच कोरोना काळाला गोरगरिबांसाठी या कारखान्याने विविध प्रकारे सामाजिक उपक्रम हाती घेतलेले आहेत. जर कारखाना असाच कार्यान्वित राहिला, तर या संपूर्ण परिसराचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी येथे सांगितले आहे की इथेनॉल प्रकल्पामुळे कारखान्यास अतिरिक्त उत्पादन मिळून परिसरातील शेतक-यांच्या ऊसाला योग्य मोबदला देण्यात येईल. कारखाना आर्थिकदृष्ट्या जास्त सक्षम होईल. तरी येथील स्थानिक शेतक-यांची विनंती आहे की सर्वांनी या प्रकल्पास पाठिंबा द्यावा.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी बैठकीत श्री नाईकवडे यांनी ज्या "Eco-Sensitive Zone (ESZ) / पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र" बाबत काही शंका उपस्थित केल्या, त्याचे निराकरण करण्यासाठी त्या क्षेत्रात काम करणा-या पर्यावरण सल्लागार यांना स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

- प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जवळील चांदोली अभयारण्यातील वन्यजीवांवर परिणाम होऊ नये त्यासाठी कशा प्रकारची काळजी घ्यावी, यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाबरोबरच भारत सरकारच्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळ/नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफ (National Board of Wild Life) या संस्थेची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. ते प्रकल्प परिसराचा संपूर्ण विचार व अभ्यास करुनच परवानगी देतात.

माननीय सर्वोच्च न्यायालय (Supreme Court of India) च्या दिनांक ०३-०६-२०२२ नुसार जर प्रकल्प हा अभयारण्याच्या एक कि.मी. बाहेर असेल तर त्याचा काही परिणाम हा वन्यजीवावर होणार नाही असा निर्णय दिलेला आहे. सदरहू संस्था ह्या बाबतीत सर्व बाजूंचा अभ्यास करुनच निर्णय देत असतात. तरीसुध्दा नियमाप्रमाणे

आपण राष्ट्रीय वन्यजीव मंडळ/नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफ (National Board of Wild Life) यांच्याकडे परवानगी मागितली असून प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री नाईकवडे यांना उत्तर देताना सांगितले की राष्ट्रीय वन्यजीव मंडळ/नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफ यांची परवानगी मिळाल्याशिवाय कुठलाही प्रकल्प सुरु करणार नाहीत.

त्यांनी पुढे सांगितले की प्रकल्पात अत्याधुनिक सयंत्रणा (सीपीयू Condensate Polishing Unit -CPU) कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे ऊसातील अतिरिक्त पाणी, उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा झेडएलडी-शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की केंद्र सरकारच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्पात अत्याधुनिक बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार असून त्यामधील १००% पोटॅश राख हि जळालेल्या स्पेंटवॉश मधून घेतली जाईल, ही अत्याधुनिक सयंत्रणा येथे कार्यान्वित करण्याचा आमचा मानस आहे. त्यांनी अभिवचन दिले की दालमिया भारत शुगर कडून परिसरातील नागरिकांना शून्य प्रकारचा त्रास होईल. त्याचप्रमाणे प्रकल्पात एअर कुल्ड कन्डेन्सर कार्यान्वीत करणार असल्याने प्रकल्पासाठी ताज्या पाण्याची गरज ही खूपच कमी होईल.

३) <u>श्री शंकर आनंदा पाटील, राहणार-करुंगळी, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-</u>

त्यांनी मा. अध्यक्षा यांना विनंती केली की आम्ही या परिसरात राहतो व आमच्या सर्व ग्रामस्थांची समस्या आहे की येथे काजळीचा येथील सर्व ग्रामस्थांना खूपच त्रास होतो. त्याचप्रमाणे प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी हे ओढ्यातून नदीला मिळते. त्यामुळे पाण्यात जे जलचर आहेत, त्यांना त्याचा त्रास निश्चितच होतो. त्याचप्रमाणे

शेतक-याचे जगण्याचे साधन म्हणजे दुग्धव्यवसाय. तर शेतक-यांची जनावरेही पाणी पित नाहीत, हे सत्य आहे. येथे सांगण्यात आले की झिरो प्रदूषण होणार आहे. मात्र वास्तव वेगळे आहे. हे सत्य तुम्ही जाणले पाहिजे. या करुंगली गावापासून पुर्वेकडील गावात पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. या सर्वांचे निराकरण करण्यात यावे.

श्री शंकर पाटील यांनी पुढे सांगितले की विस्तारिकरणानंतर प्रकल्पात एकूण ४५० मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. या प्रकल्पासाठी खूप स्थानिक लोकांनी त्यांच्या जमिनी बक्षिसपात्र दिलेल्या आहेत. त्यांचा किंवा त्यांच्या वारसांचा नोकरीसाठी विचार व्हावा. येथे बरेच शेतकरी आलेले असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदनही दिलेले आहे. येथे रोजगार मिळत नसल्याने येथील युवकास अल्प पगाराच्या नोकरीसाठी मुंबईस जावे लागते. तरी त्यांचा प्रकल्पात नोकरीसाठी विचार करावा ही विनंती.

- यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना स्पष्टीकरण दिले की सदरहू जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पासाठी असून कार्यरत प्रकल्पाविषयीच्या प्रदूषणाबाबत आपले प्रश्न असतील, ते त्या त्या वेळी स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय-सांगली, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याशी ईमेलव्दारे किंवा प्रत्यक्ष संपर्क साधून निदर्शनास आणल्यास त्या त्या वेळी शहानिशा करुन त्याबाबत म.प्र.नि.मंडळ पुढील कार्यवाही निश्चितच करेल.

त्यांनी पुढे सांगितले की मी शाळेतील शिक्षक आहे. येथे जो वाहनतळ आहे, तेथून सांडपाणी जाते. त्याचे मी फोटो काढलेले आहेत. मी शेतकरी आहे._मी शाळेत शिक्षक असून तास काढून येथे आलेलो आहे. ग्रामस्थांची मागणी होती म्हणून मी सांडपाण्याबाबत सांगण्यास आलो. मला राजकारणाशी काहीही देणेघेणे नाही.

- त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. हे व्यासपीठ त्यासाठीच आहे.

त्यामुळे येथे राजकारण हा विषय धरु नका आणि कोणीही वैयक्तिक घेऊ नये. ज्यांना सूचना, आक्षेप नोंदवायच्या असल्यास त्या त्यांनी बिनधास्त नोंदवाव्यात. त्यासाठी हे व्यासपीठ असून येथील स्थानिक जनतेच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठीच ही बैठक आहे.

४) श्री सुनील फराटे, राहणार. कसबेडिग्रज, तालुका- मिरज, जिल्हा- सांगली.

या कारखान्याच्या प्रदूषणाबाबत आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय व मप्रनि मंडळ, सांगली यांना तक्रार दिलेली आहे. या कार्यरत प्रकल्पातील जो ईटीपी आहे, तो ब-याच वेळा ओव्हरफ्लो होतो आणि शेतक-यांच्या शेतात पाणी जाते. ब-याच वेळा ते पाणी नदीत सोडले जाते. ईटीपीची देखभाल केली जात नाही. ब-याचवेळा शेतक-यांनी स्थानीक मप्रनि मंडळ कार्यालय, सांगली यांना तक्रारी केलेल्या आहेत. पण त्यात फारशी कारवाई झालेली दिसत नाही. त्यामुळे ईटीपी ओव्हरफ्लो होऊन पाणी शेतात जाणार नाही. जर शेतक-यांची शेती कंपनीच्या पाण्यामुळे खराब झाली तर त्यास जबाबदार कोण असेल?

त्यांनी पुढे सांगितले की कारखान्याच्या नावामध्ये सांशकता निर्माण होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अनुमती पत्रात (२०२०,२०२१,२०२२) नांव निनाईदेवी साखर कारखाना, निनाईदेवी, कोकरुड असे आहे. तर पर्यावरण अनुमतीसाठी दालमिया भारत शुगर एण्ड इंडस्ट्रीज लिमिटेड, शुगर युनिट-निनाईदेवी, कोकरुड असे नांव आहे. तसेच सर्व प्रकारच्या शासकीय परवान्यांसाठी निनाईदेवी साखर कारखाना, कोकरुड , शिराळा असे नांव आहे. मात्र निनाईदेवी साखर कारखाना, कोकरुड , शिराळा असे शासकीय पत्रे नाहीत. तर शुगर इंडस्ट्रीज कोडमध्य दालमिया नाव आहे.

- त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की श्री सुनील फराटे यांचे १२ मुद्द्यांच्या आक्षेपाचे पत्र प्राप्त झालेले असून त्याबाबत

कारखान्याच्या स्पष्टीकरणासह इतिवृतासोबत पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

५) **श्री संजय मारुती पाटील, सरपंच, राहणार-करुंगळी, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-**

हा कारखाना माझ्या घरापासून पाच-दहा मिनिटांच्या अंतरावर आहे. आपल्या डोंगरीभागाचे शिल्पकार कैलासवासी शिवाजीराव देशमुखसाहेब व शिराळा तालुक्याचे दैवत यांनी या कारखान्याचा पाया रचला. तर दालमिया यांनी कळस रचला. हा कारखाना आता विस्तारिकरण व नवीन उत्पादन घेत आहे याचा आम्हांला अभिमान आहे. चार वर्षे झाली ही कंपनी दालमिया चालवत आहे. मी करुंगली गावाचा रहिवाशी असून आम्ही येथील शेतकरी कंपनीचे पाणी मागून शेतीला पुरवितो. आम्हां करुंगली ग्रामवासियांना कुठलाही त्रास झालेला नाही.

६) **श्री संदीप शामराव चव्हाण, राहणार - इनामवाडी,पोस्ट आरळा, तालुका–शिराळा, जिल्हा -सांगलीः-**

कारखान्याच्या अगदी जवळच माझे घर आहे. मला असे सांगायचे आहे की सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, चांदोली व हा कारखाना नसता तर आपण एक आदिवासी पाडा म्हणूनच राहिलो असतो. आपली कुठलीही व्यवसाय वृध्दी झाली नसती याचा विचार येथील शेतकरी, स्थानीक लोक व येथील बेरोजगार यांनी विचार केला पाहिजे. मी येथे येण्यापूर्वी येथील स्थानिकांशी चर्चा केली असता जवळजवळ ९५% लोकांनी असे इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प असावे, जेणेकरुन येथे रोजगारनिर्मिती होऊन येथील तरुणाला मुंबईस जाण्याची गरज भागणार नाही. तरी ही प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित व्हावा अशी येथील सर्व लोकांची कळकळीची विनंती आहे. येथे कुठलेही राजकारण नाही. जेवढे शक्य आहे, तेवढा आपण या प्रकल्पास पाठिंबा द्यायला पाहिजे. बेरोजगारांनी रोजगाराची संधि मिळालीच पाहिजे.

त्यांनी पुढे सूचना केली का या प्रकल्पाबाबत जे गैरसमज आहेत, ते कारखाना प्रशासनाने दूर केले पाहिजेत. प्रदूषणावर , सांडपाण्यावरही उपाय आहेत. मात्र काहीजण उगीचच नकारात्मक विचार पसरवितात. तरी हा प्रकल्प यशस्वीपणे उभा राहिला पाहिजे व त्यासाठी स्थानिक शेतकरी पूर्णपणे पाठिंबा देत असून आम्ही मनाने, तनाने या प्रकल्पास मदत करु. हा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर आपल्या पश्चिम भागात सामाजिक कार्य कसे होईल याचे एक उदाहरण द्यावे ही विनंती.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण दिले की श्री फराटे, श्री पाटील यांनी सांगितले की कारखान्यातील दूषित पाणी नदीत सोडले जाते. पण तशी कुठलीच व्यवस्था नाही. केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ याच्या निर्देशांनुसार प्रकल्पात Continuous Online Monitoring System कार्यरत आहे. त्याचे कनेक्शन हे नवी दिल्ली व मुंबईला आहे. जर खराब पाणी बाहेर पडले तर लगेच रेड अलर्ट येतो. दालमिया ग्रुपचे ध्येय आहे की व्यवसाय करायचा,पण प्रदूषण न करता व्यवसाय करायचा आहे. जर प्रदूषण केले, तर पुढच्या पिढीला आपण काहीही ठेऊ शकणार नाही.
- प्रकल्प अधिकारी यांनी येथे सांगितले की उपस्थित श्री फराटे यांची गैरसमज झालेला आहे की एकाच कंपनीची वेगवेगळी नांवे कशी? हा कारखाना दालमिया यांनी विकत घेतलेला आहे. तर दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लिमिटेड, शुगर युनिट-निनाईदेवी, कोकरुड हे नवीन नांव असून त्याबाबत विविध खात्यामध्ये नांव बदलण्याची प्रक्रिया चालू आहे.

श्री संदीप चव्हाण यांनी सीएसआर अंतर्गत कुठले उपक्रम राबवविले व भविष्यात राबवविणार याबाबत माहिती विचारली. तर आतापर्यंत दालमिया ग्रुपने सामाजिक कार्यासाठी करोडो रुपये खर्च केलेले आहेत. परिसरातील शाळेत कंपाऊंड बांधून पाहिजे असेल, पत्रे टाकून हवे असतील, स्मशानभूमि बांधून हवी असेल, नैसर्गिक आपत्ती असेल तर दालमिया कंपनी निश्चितच मदत करेल.

(७) **श्री जगन्नाथ साळुंखे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

सीएसआर निधीतून स्थानिक शेतकरी बांधवांना आता करत असलेले पीक उत्पादन, स्थानिक परिस्थितीनुसार कोणते उत्पादन घ्यावे याबाबत माहिती देणे, उत्पादन वाढीसाठी नवीन बी-बियाणे उपलब्ध करुन पीकांच्या वाढीसाठी खत उपलब्ध करणे, पीक उत्पादन वाढीसाठी जनजागृती करणे, शास्त्रीयदृष्ट्या शेती करणे असा कार्यक्रम आपण राबविला आहे काय, नसल्यास भविष्यात तसा प्रयोग करणे व त्यासाठी निधी राखीव ठेवणे आवश्यक आहे. ही माहिती उपलब्ध करुन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्याची नोंद घेणे ही सूचना सदस्य यांनी केली.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की नक्कीच शेतकरी बांधव या योजनेचे स्वागत करतील. मागच्या वर्षी प्रकल्पात ऊस विकास (cane development) कार्यक्रम हाती घेतला होता. Land Holding /जमिन धारणा कमी असल्याने त्या क्षेत्रात जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी दालमियानी इंटरनॅशनल संस्थेबरोबर एक करार केलेला आहे. शेतक-याचा उत्पादन खर्च निम्यावर आणून त्यांचे उत्पन्न ३०-४०% वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यासाठी प्रकल्पाने २०० भूखंड निवडले व त्या २०० भूखंडाचा निष्कर्ष हा अत्यंत आशावादी आहे.
- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की या भागात तांदूळ पिकतो. तो बराच वेळा सडतो. तर तो सडलेला तांदुळ आम्ही खरेदी करुन त्याच्यापासून इथेनॉल निर्मिती करण्यात येणार आहे. त्यांनी पुढे सांगितले की कंपनीच्या मागच्या बाजूस सीड प्लॅन्ट विकसित करण्यात आलेला आहे.

८) **श्री राम पाटील, सरचिटणीस, मनसे.**

मागच्या वर्षी आमच्या मनसे पदाधिकारी यांनी आम्ही पाण्याचे पुरावे देऊन मुद्दे सादर केलेले होते. तसेच निवेदनात मुद्दे दिलेले होते. माझे आक्षेप आहेत.

९) **श्री आनंदराव बाळकू पाटील, राहणार- काळुंद्रे, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-**

येथे उपस्थितांनी प्रदूषणाबाबत विचारलेले प्रश्न हे खरे आहेत, त्याचप्रमाणे विकासासाठी, बेरोजगारी कमी होण्यासाठी उद्योगांचीही गरज आहे हेही खरे आहे. त्यामुळे कारखान्यास प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करावीच लागणार.

आता दालमिया प्रशासनाने कर्मचारी व जे शेतकरी ऊस पुरवितात त्यांनी मोफत वैदकीय उपचार केंद्र सुरु करण्यात यावे. भविष्यात सर्वांना स्वस्त दराने औषधोपचार पुरविण्यासाठी दवाखाना चालू करण्यात यावा.

- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की कर्मचा-यांसाठी दवाखाना आतमध्ये आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आम्ही आरोग्य विमा योजना राबवविणार आहोत.

१०) **श्री हणमंतराव नामदेव पाटील, (माजी सभापती, पंचायत समिती-शिराळा), राहणार- पणुंब्रे, तालुका-शिराळा,जिल्हा-सांगलीः-**

या परिसरात जागतिक वारसा लाभलेला सह्याद्री व्याघ्र प्रकल्प आहे. जवळच चांदोली धरण आहे. बिसलेरी बाटलीतील पाण्यापेक्षा स्वच्छ पाणी चांदोली धरणात आहे. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी अनेक लोक पर्यटनाला येत आहेत. येथे निसर्गाचे वैभव आहे. हे वैभव कुठल्याही परिस्थिती टिकायला पाहिजे. पण जेव्हा ३६०.० लाख मेट्रीक टन साखर देशाच्या पातळीवर तयार होईल. शिराळा तालुका हा महाराष्ट्रातील डोंगरी तालुका आहे. पूर्वी लोक येथे शिकार व मासेमारी करुन जगत होते. चांदोली धरण झाल्यामुळे तेथे मासेमारीस बंदी आहे, अभयारण्य झाल्यामुळे शिकारीला परवानगी नाही. त्यामुळे येथे बेरोजगार भरपूर प्रमाणात होते. जसे येथील निसर्गवैभण टिकले पाहिजे, त्याचप्रमाणे बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी प्रकल्पांची गरज आहे. बरेच लोक हे पुणा-मुंबईला रोजगारासाठी जातात. आता येथे हजारो एकरात ऊस तयार होत आहे. ०-२६ कि.मी.कालवा क्षेत्रात संपूर्णपणे ऊस आहे.

आता कारखान्याचे विस्तारिकरण नियोजित आहे, तर त्यांनी अटी व शर्ती पाळून विस्तारिकरण करावे. पण अटी व शर्तीचे उल्लंघन झाले व येथील नैसर्गिक वैभवाला काही त्रास झाला, तर आम्ही कुठल्याही परिस्थितीत गप्प बसणार नाही. आम्ही प्रकल्पाच्या विरुध्द जाऊ. त्याचप्रमाणे हा प्रकल्प येथे व्हायलाच पाहिजे अशी आमची सर्व शेतक-यांची मागणी आहे. त्याचप्रमाणे कारखान्याने येथे सोयीसुविधा पुरवाव्यात. आताच प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की कामगारांना आरोग्य वीमा योजना मंजूर करणार आहेत. तसेच आरोग्याच्या सुविधा स्थानिक लोकांसाठी कराव्यात. शैक्षणिक, सामाजिक जबाबदारी प्रकल्पाने घ्यावी. मात्र प्रकल्प प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व्यवस्थित चालवितो का व सर्व अटी व शर्तींचे पालन करतो का हे पहाणे सर्वांचीच जबाबदारी आहे. मात्र येथील प्रगतीची सर्व खबरदारी येथील सर्वजण घेणार आहोत. तरी सर्व अटी व शर्ती पाळून हा प्रकल्प आपण चालू करावा. आरोग्याची जबाबदारी सर्वांची घ्यावी.

- प्रकल्प प्रवर्तकांनी श्री हणमंतराव पाटील यांचे आभार मानले व अभिवचन दिले की शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल.

११) <u>श्री संपतराव गुलाबराव देशमुख, जिल्हा परिषद सदस्य सांगली, राहणार-कोकरुड. तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-</u>

त्यांनी सांगितले की आमचे मत आहे की या प्रकल्पाचा कोणाताही प्रदूषणाचा त्रास परिसरातील लोकांना होऊ नये. हा प्रकल्प हा "प्रदूषण विरहित प्रकल्प" असावा. यासाठी प्रकल्प व्यवस्थापनाने आग्रहाने लक्ष द्यावे. दालमिया व्यवस्थापनाने ऊसाला दर दिलेले आहेत. तरी प्रकल्प व्यवस्थापकांना विनंती आहे की ऊसाचे वजनाबाबतीत काळजी घ्यावी. आपण पूर्वी वजनाबाबत दक्षता घेतलेली आहे, तशीच भविष्यात घेण्यात यावी. एक ग्रॅम वजनही कमी करु नये. त्याचप्रमाणे जो व्याघ्र प्रकल्प आहे, त्यास मदत करण्यात यावी. साखर स्वस्त दरात उपलब्ध करून द्यावी.

त्यांनी पुढे सांगितले की या प्रकल्पासाठी परिसरातील अनेक लोकांनी जमिन बक्षिसपात्र दिलेली आहे. वारणेचे पाणी शुध्द आहे. मात्र कारखान्यामुळे ते प्रदूषित होऊ नये याची काळजी कंपनीने घ्यावी. शेतक-यांना फायदा होईल अशा विविध योजना राबविण्यात याव्यात, त्यामुळे कारखान्याचेही नांव होईल.

- प्रकल्प प्रवर्तकांनी श्री संपतराव देशमुख यांचे आभार मानले व अभिवचन दिले की त्यांनी व्यक्त केलेल्या मतांप्रमाणे सदरहू प्रकल्प हा प्रदूषण विरहित प्रकल्प राहिल. त्यांनी सांगितले की व्याघ्र प्रकल्पात वीज नाही, तर आम्ही सोलर लाईट पुरविले. तसेच सामाजीक बांधिलकी सांभाळून हा कारखाना चालविला जाईल.
- आयोजक यांनी उपस्थितांना विचारलेल्या प्रश्नांशिवाय इतर काही प्रश्न असल्यास ते विचारण्याचे आवाहन केले. आयोजक यांनी सांगितले की जनसुनावणीची जाहिर सूचना वृत्तपत्रात दिल्यानंतर आतापर्यंत सात निवेदने/आक्षेप प्राप्त झालेले आहेत. त्यातील काही कार्यालयात तर काही येथे प्राप्त झालेली आहेत.
- आयोजक यांनी आक्षेप सादर करणा-यांची नावे वाचून दाखविली. ती खालीलप्रमाणे-

१. श्री.बाळासाहेब नाईकवडी, उपसभापती पंचायत समिती, शिराळा;

२. श्री सुनील फराटे, अध्यक्ष स्वतंत्र भारत पार्टी सांगली

३. श्री सम्राट विजयसिंह शिंदे, शिराळा.

४. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली.

५. श्री राम पाटील, महाराष्ट्र नवनिर्माण सेना.

६. श्री. किसन दादू सुतार व इतर करुंगुली व आराळा ग्रामस्थ,शेतकरी.

प्रकल्प अधिकारी व प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांना सूचना करण्यात येते की त्यांनी मुद्द्यांनुसार सदरहू आक्षेपांना उत्तर द्यावे. ते अंतिम पर्यावरण अहवालासोबत केंद्र शासनास पाठविले जाईल. त्यांनी सद्स्य यांना आपले मत व्यक्त करण्याची विनंती केली.

सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प हा डोंगराळ भागात असल्याने आपण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यक्षमतेने राबवावी. त्यांनी पुढे सांगितले की काही उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की कार्यरत प्रकल्पातील ईटीपी हा ओव्हर-फ्लो होतो. तर त्यादृष्टीने ईटीपीत सुधारणा होते का ते पाहवे व सुधारणा झालीच पाहिजे. ईटीपीची देखभाल योग्य प्रकारे करण्यात यावी.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी समितीच्या अध्यक्षा यांना आपले मत व्यक्त करण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आज आपण दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लिमिटेड (DBSIL) महाराष्ट्र, मुक्काम पोस्ट-आरळा करुंगळी, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मोलॅसिस/केन ज्यूस/धान्यावर आधारित १५०.० केएलपीडी क्षमता आसवणी प्रकल्प तसेच प्रस्तावित आसवणी को-जनरेशन विद्युत प्रकल्प क्षमता ३.० मेगावॅट आणि सध्याच्या सह-ऊर्जा प्रकल्प (४.५ मेगावॅट ते ७.५ मेगावॅट क्षमता) विस्तार तसेच सध्याची ऊसगाळप क्षमता (३५०० टीसीडी ते ६००० टीसीडी) विस्तार प्रकल्प उभारणीच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी जमलो आहोत. प्रदूषणाबरोबरच उद्योगांची आवश्यकता अशी दोन्ही बांजूनी संतुलित मते मांडण्यात आली. प्रगती, विकासाबरोबरच आपणास प्रदूषण टाळण्याचा विचार करावा लागतो.

अध्यक्षा म्हणाल्या सादरीकरणात सर्व पर्यावरणाचे मुद्दे घेण्यात आलेले आहेत. त्यात रिच पोटॅशबाबत सांगण्यात आले. तर रिच पोटॅश स्थानिक शेतक-यांना कसा उपलब्ध करुन देणार आहात? आपण झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असेल असे सांगितले. ते चांगले आहे, पण येथे बैठकीत जे मुद्दे उपस्थित झाले, त्याअनुषंगाने प्रकल्पातील सांडपाणी हे जमिनीत मुरते का याचा अभ्यास करण्यात यावा. नागरिकांनीही प्रदूषण नियंत्रणासाठी व्यक्तीशः प्रयत्न केले पाहिजे.

अध्यक्षा यांनी सांगितले की बैठकीत तीन मुद्दे विशेष चर्चिले गेले, जल प्रदूषण, येथील निसर्ग संपत्ती आणि येथील व्याघ्र प्रकल्प.

अध्यक्षा यांनी प्रकल्पातील घातक घन कच-याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले नाही ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात देण्यात यावे अशी सूचना केली. त्यांनी सांगितले की हरितपट्टा विकसित करताना अशी झाडे लावण्यात यावी की ते प्रदुषण शोषून घेतात व जमिनीचा कस सुधारतात. मणदूर मध्ये एक संग्रहालय आहे त्यात या ठिकाणच्या निसर्गातील घटकांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे ३३% हरितपट्टा विकसित करताना त्यातील १% जागेवर आंतरराष्ट्रीय संशोधनाने मान्य केलेली काही आंतरराष्ट्रीय प्रदुषणमुक्त करणारी झाडे लावण्यात यावीत. म्हणजे भारतीय पारंपारिक झाडांबरोबरच आंतरराष्ट्रीय संशोधनाने मान्य केलेली काही आंतरराष्ट्रीय झाडे लावण्यात यावीत. निसर्गाचे संवर्धन व विकास हे दोन्ही हातात-हात घालून केले तरच शाश्वत विकास होतो हे सत्य आचरण्यात आणले पाहिजे. प्रदुषण जसे संस्थात्मक स्थरावर आहे तसेच वैयक्तिक स्थरावर होते. उदा. या निसर्गातील प्लास्टिकचा वापर, स्वच्छ पिण्याचे पाणी असतानाही बाटलीबंद पाणी, जेवणासाठी वापरण्यांत येणारे प्लास्टिक पत्रावळीचा वापर, वाहनांचा अति वापर वगैरे यावरही सुजान नागरीकांनी स्वत:हुन बंदी घातली पाहिजे म्हणजे दोन्ही स्तरावरील प्रदुषण कमी होईल आणि पर्यावरणाचे संवर्धन व शाश्वत विकास होईल.

आयोजक, यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की मा. अध्यक्षा यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या कारखाना प्रशासनाने तंतोतंत पाळण्यात याव्यात.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व मा. अध्यक्षा यांच्यावतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

सुनावणीची कार्यवाही सकाळी ११.०० वाजता सुरु होऊन दुपारी ०२.३० वाजता समाप्त झाली.

सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जनसुनावणी संदर्भात दिनांक १३-०६-२०२२, २७-०६-२०२२, २९-०६-२०२२ आणि ३०-०६-२०२२ रोजी या कर्यालयास पोस्टाने, ईमेलव्दारा हस्ते, तसेच सुनावणीवेळी आक्षेप/सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदरील सूचना/आक्षेपांची सविसतर खुलासा लेखी स्वरुपांत कारखाना/कारखान्यांचे तांत्रिक सल्लागार यांचेकडून दिनांक ०७-०७-२०२२ रोजी प्राप्त झालेल्या आहेत. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

(नवनाथ सं. अवताडे)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,
सांगली

(जगन्नाथ शं. साळुंखे)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
कोल्हापूर

(श्रीमती. मोसमी चौगुले -बर्डे)
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली,